# सोनेवाडी येथे शेतकऱ्यांना मार्गदर्शन



निफाड: ग्रामीण उद्यानविद्या कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत क. का. वाघ उद्यानविद्या महाविद्यालय, नाशिक येथील विद्यार्थिनी रिया केदार, अनिता तवर आणि निकिता गिरी यांनी ओझर येथील सोनेवाडी वस्ती या ठकाणी शेतकऱ्यांना शेतीविषयक अनेक विषयांवर मार्गदर्शन केले. या वेळी प्रगतशील शेतकरी भूषण दौलत भिकुले यांच्या सोबत संवाद साधला व शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली.गावातील युवा आणि शेतकरी सामोरे जात असलेल्या अडचणी जाणून घेऊन त्यावर विविध उपाययोजना, प्रात्यक्षिके, कृषी सरकारी योजना,रासायनिक खतांचा वापर, रोजगारांच्या संधी व आधुनिक शेती या मुद्यांवर विशेष भर देऊन अनेक कार्यक्रमराबविण्यात आले. विशेष शिक्षक,प्राचार्य विकास संधान आणि प्राध्यपकांचे विशेष सहकार्य लाभले.

# कृषी महाविद्यालयाची कृषिकन्या धनश्री विश्वास निरगुडे शेतकऱ्यांना मार्गदर्शन







ग्रामीण उद्यानविद्या कार्यानुभव आणि कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत क का.वाघ . उद्यानविद्या महाविद्यालय, नाशिक येथील कृषीकन्या निरगुडे धनश्री विश्वास यांनी शेतकऱ्यांना शेती विषयी मार्गदर्शन केले.

शेती अभ्यासक्रमात ग्रामीण कृषी जागरूकताआणि उद्यानविद्या औद्योगिक कार्यानुभव अंतगृत प्रात्यक्षिक शिक्षणावर भर दिला जातो. यामध्ये विद्यार्थी प्रत्यक्ष शिवारात जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करगे अपेक्षित आहे. त्याला अनुसरून निंब्रे येथे क. का. वाघ उद्यानविद्या , कृषिकन्या निरगुडे धनश्री विश्वास यांनी फळ पिकावरील भुरी आणि डाउन्या रोग व त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या बोर्डो मिश्रण तयार करण्याची पद्धत व त्याचा फायदा याविषयी मार्गदर्शन केले.

शेतकऱ्यांना शेती विषयक माहिती नवीन आधुनिक तंत्रज्ञान शेतीउद्योग व्यवसाय, रासायनिक खतांना योग्य वापर व इतर शेती विषयक बाबीविषय मार्गदर्शन केले.

तसेच कृषी सेवा केंद्रातही विविध रासायनिक किटकनिशक आणि बुरशी नाशक यांची ओळख करण्यात आली.आणि ती माहिती शेतकरी व बाकी लोकांना देन्यात आली

क. का. वाघ उद्यानविद्या महाविद्यालय ,नाशिक मधिल विशेष शिक्षक, प्रा. बी. संधान सर,प्रा एन.घोगरे सर,प्रा आर सोमवशी सर, प्रा बी.तायडे सर, प्रा पी .बस्ते सर, प्रा एस. विधाते सर, प्रा .पी. शिरक्षागर सर विशेष सहकार्य लाभले . तसेच या उद्यानविद्या कार्यानुभव उपक्रमात प्रगतशिल शेतकरी पुरस्कार प्राप्त कांतीलाल बामन गवळी आणि मनोज गवळी, विश्वासराव निरगुडे पाटील खंडेराव गवळी उपस्थित होते.

## श्रीरामपूरच्या गटशिक्षणाधिकारीपदी साईलता सामलेटी

श्रीरामपूर – श्रीरामपूर पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारीपदी साईलता सामलेटी यांनी पदभार स्वीकारला. तत्कालीन गटशिक्षणाधिकारी सुनील सूर्यवंशी यांची राहुरी येथे बदली झाल्यानंतर हे पद रिक्त होते. ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी संजीवन दिवे यांनी प्रभारी गटशिक्षणाधिकारी म्हणून काम पाहिले. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांचा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष जाकिर सय्यद, सचिव सुनील म्हसे, उपाध्यक्ष राजकुमार तांबे, दिलीप नाईक, दत्तात्रय कांबळे, बहिरे, सहसचिव जयश्री उंडे, मंगल दुशिंग यांनी स्वागत केले.

Pdf बात
बातमी तयार क

# कृषी महाविद्यालयाचा कृषिदुत शुभम विष्णूसिंग परदेशी शेतकऱ्यांना मार्गदर्शन



**कोरेगाव (युवा ध्येय)**
**संजीत घालमे**

ग्रामीण उद्यानविद्या कार्यानुभव आणि कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत, कोरेगाव, ता. कर्जत, अहमदनगर येथे क. का. वाघ उद्यानविद्या महाविद्यालय, नाशिक येथिल कृषीदुत परदेशी शुभम विष्णूसिंग यांनी शेतकऱ्यांना शेती विषयी मार्गदर्शन केले. शेती अभ्यासक्रमात ग्रामीण कृषी जागरूकता आणि उद्यानविद्या औद्योगिक कार्यानुभव अंतगृत प्रात्यक्षिक शिक्षणावर भर दिला जातो. यामध्ये विद्यार्थी प्रत्यक्ष शिवारात जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे अपेक्षित आहे. त्याला अनुसरून कोरेगाव येथे क. का. वाघ उद्यानविद्या, कृषिदुत परदेशी शुभम विष्णूसिंग यांनी फळ पिकावरील विविधरोग आणि त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या रासायनिक औषधे व तयार करण्याची पद्धत, त्याचा फायदा याविषयी म ार्गदर्शन केले.

शेतकऱ्यांना शेती विषयक माहिती नवीन आधुनिक तंत्रज्ञान शेतीउद्योग व्यवसाय, रासायनिक खतांचा योग्य वापर व इतर शेती विषयक बाबीविषय मार्गदर्शन केले.

तसेच आणि ती माहिती शेतकरी व बाकी लोकांना देन्यात आली. क. का. वाघ उद्यानविद्या महाविद्यालय, नाशिक मधिल विशेष शिक्षक, प्रा. बी. संधान सर, प्रा. एन. घोगरे सर,प्रा आर सोमवशी सर, प्रा बी.तायडे सर, प्रा. पी. बस्ते सर, प्रा एस. विधाते सर, प्रा. पी. शिरक्षागर सर विशेष सहकार्य लाभले. तसेच या उद्यानविद्या कार्यानुभव उपक्रमात प्रगतशिल शेतकरी पुरस्कार प्राप्त मनोजसिंग परदेशी, तसेच ईश्वर परदेशी अक्षय परदेशी, शेखर परदेशी, करण परदेशी, अजय परदेशी उपस्थित होते.

लोकमत



# शिरसोली येथे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

जळगाव : ग्रामीण उद्यानविद्या कार्यानुभव कार्यक्रमाअंतर्गत क. का. वाघ उद्यानविद्या महाविद्यालय, नाशिक येथील विद्यार्थिनी स्मितल विनोद मेढे आणि हिमानी सुनील निळे यांनी शिरसोली येथील शेतकऱ्यांना शेतीविषयक अनेक विषयांवर मार्गदर्शन केले. या वेळी मोहाडी येथील तलाठी सारिका वाडकर यांच्यासोबत संवाद साधला व शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली. गावातील युवा आणि शेतकरी सामोरे जात असलेल्या अडचणी जाणून घेऊन त्यावर विविध उपाययोजना, प्रात्यक्षिके, कृषी सरकारी योजना, रासायनिक खतांचा योग्य वापर, रोजगाराच्या संधी व आधुनिक शेती या मुद्द्यांवर विशेष भर देऊन अनेक कार्यक्रम राबविण्यात आले. विशेष शिक्षक, प्राचार्य विकास संधान आणि प्राध्यापकांचे विशेष सहकार्य लाभले.

Hello Jalgaon
Page No. 3 Aug 26, 2021
Powered by: erelego.com

नाशिक जिल्हा

# न्यूज ब्रीफ

## कृषिकन्येचे रामशेज येथील शेतकऱ्यांना मार्गदर्शन



ओझर | ग्रामीण उद्यान विद्या कार्यानुभव आणि कृषी उद्योग आधारित कार्यक्रमांतर्गत कर्मवीर काकासाहेब वाघ उद्यानविद्या महाविद्यालय, नाशिक येथील कृषिकन्या मानसी गायकवाड यांनी शेतकऱ्यांना शेती विषयी मार्गदर्शन केले. रामशेज येथे कर्मवीर काकासाहेब वाघ उद्यान महाविद्यालयातील कृषिकन्या मानसी अरुण गायकवाड, साक्षी नितीन बनसोडे यांनी फळपिकांवर भुरी आणि डावण्या रोग व त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी वापरण्यात येणारे मिश्रण तयार करण्याची पद्धत व त्याचा फायदा याविषयी मार्गदर्शन केले. शेतकऱ्यांना शेतीविषयक माहिती, नवीन अत्याधुनिक तंत्रज्ञान, शेती उद्योग व्यवसाय, रासायनिक खतांचा योग्य वापर व इतर शेती विषयक बाबींविषयी मार्गदर्शन केले. तसेच कृषी सेवा केंद्रातही विविध रासायनिक कीटकनाशक आणि बुरशीनाशक यांची ओळख करण्यात आली.

## » अवतीभवती




**मोहाडी : 'सह्याद्री' फार्मच्या भेटीप्रसंगी कृषिदूत ओंकार कावळे, विक्रम थेटे, प्रतीक शिरसाठ, वैभव कडलग, मोहित देवरे, अनिकेत पाटील, अक्षय ढगे, हर्षल कावळे, शुभम ढगे आदी.**

# कृषिदूतांची 'सह्याद्री' फार्मला भेट

**नाशिक :** येथील क. का. वाघ उद्यान विद्या महाविद्यालयातील कृषिदूतांनी ग्रामीण उद्यान विद्या कार्यानुभव आणि कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत मोहाडी येथील सह्याद्री फार्मला भेट देऊन शेतीविषयक माहिती घेतली. शेती अभ्यासक्रमात प्रात्यक्षिक शिक्षणावर भर दिला जात आहे. कृषिदूत ओंकार कावळे, विक्रम थेटे, प्रतीक शिरसाठ, वैभव कडलग, मोहित देवरे, अनिकेत पाटील, अक्षय ढगे, हर्षल कावळे, शुभम ढगे यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. दुगाव येथे फळ पिकावरील भुरी आणि डाउनी रोगावर नियंत्रण मिळविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या बोर्डो मिश्रण निर्मितीविषयी मार्गदर्शन केले. नवीन आधुनिक तंत्रज्ञान, शेती उद्योग व्यवसाय, मशरूम कल्टिवेशन, वृक्षारोपण व रासायनिक खतांच्या योग्य वापराबाबत माहिती दिली. तसेच, सह्याद्री फार्म, हायटेक नर्सरी, फूल नर्सरी, पोल्ट्री फार्मवर भेटी दिल्या. कृषिसेवा केंद्रातही विविध रासायनिक कीटकनाशके, बुरशीनाशकांची ओळख करण्यात आली. प्राचार्य विकास संधान, प्रा. घोगरे, राहुल सोमवंशी, भूषण तायडे, प्रवीण बस्ते, संदीप विधाते, प्रसाद क्षीरसागर, दर्शना मोरे, अश्विनी चोथे, पल्लवी घुले यांचे सहकार्य लाभले. या वेळी प्रगतिशील शेतकरी हरिभाऊ धोंडगे, गणेश थेटे, सूरज थेटे, तेजस धोंडगे आदी उपस्थित होते.